# ६ मी आणि प्रयोगजीवी कला



"जिथे शब्द थांबतात, तिथून कला सुरू होते."

## उद्दिष्टे :

१. नाटक मनोरंजक बनवू शकणाऱ्या काही घटकांची नावे विद्यार्थ्यांना समजणे व त्यांचे महत्त्व स्वत:च्या शब्दांत मांडता येणे.
२. मानवेतर पात्रे नाटकात कशी रंगवता येतील याबद्दल स्वत:ची कल्पकता वापरण्याची संधी मिळणे.
३. एकच संवाद विविध संदर्भात, विविध प्रसंगी होऊ शकतो हे समजणे व तशी कल्पना करण्याचा सराव करणे.
४. सूत्रसंचालन कलेची व काही लोकनृत्यांची ओळख होणे.
५. नृत्याचे मानवी जीवनातील महत्त्व आपल्या शब्दांत सांगता येणे.
६. अवकाश, काळ व जोश या तिन्ही घटकांचा वापर नृत्यात करता येण्याचा सराव करणे.
७. भारतीय भूभागाप्रमाणे प्रचलित वाद्यांची ओळख होणे व त्यांच्यातील विविधता समजणे.
८. आपल्याला आवडलेले संगीत नेमके का आवडते आहे याचे विश्लेषण स्वत:च्या शब्दांत करता येणे.

मागील वर्षी आपण प्रयोगजीवी कलांबद्दल थोडक्यात माहिती घेतली. यावर्षी आपण त्यांच्याबद्दल अधिक विस्ताराने जाणून घेऊया.

### नाट्य

**थोडे आठवून पहा !**

१) खालील गोष्ट नाटकात रूपांतरित करायची झाल्यास त्यात काय कमी आहे असे तुम्हांला वाटते?

''एक शेतकरी होता. तो खूप काबाडकष्ट करायचा व कुटुंबाचे पालन पोषण करायचा.

हळूहळू त्याची मुले शिकायला लागली, मोठी झाली, स्वत:च्या पायावर उभी राहिली. सगळी मुले चांगली निघाली.

मुले आपल्या आईवडलांवर खूप प्रेम करायची. अशा रीतीने ते आनंदाने राहात.''

२) एखादी व्यक्तिरेखा उभी करताना कुठल्या घटकांकडे लक्ष दिले पाहिजे? – उदा. एक गरीब म्हातारी स्त्री.

यापूर्वी शिकलेल्या नाट्यासंदर्भातील संकल्पनाच्या आधारे विचार करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्या.

नाटकातील संघर्ष, व्यक्ती रेखेबद्दलचा विचार, वेशभूषा, हावभाव, आवाज, देहबोली या सगळ्या संकल्पनांची उजळणी करा.

**नाटक मनोरंजक बनवू शकणारे काही घटक**

### १. नेपथ्य :

नाटक कुठे घडते आहे हे दर्शवण्यासाठी किंवा नाटकातील प्रसंग अधिक वास्तववादी किंवा प्रभावी होण्यासाठी मंचावर जी रचना केली जाते त्याला नेपथ्य असे म्हणतात. त्याला 'नाटकाचा सेट' असा प्रचलित शब्द आहे.




### २. वेशभूषा :



नाटकातील पात्रे कोण आहेत, कोणत्या काळातील आहेत, त्यांची वैशिष्ट्ये, नाटक सादर करण्याची शैली या सगळ्याचा विचार करून नाटकातील पात्रांची वेशभूषा (पोशाख) ठरवला जातो. उदा. ऐतिहासिक नाटक असेल तर त्याला साजेशी वेशभूषा करणे.

### ३. रंगभूषा :

एखाद्या नाटकातील पात्रांच्या वेशभूषेचा जसा विचार केला जातो, त्याचप्रमाणे पात्रांचे वय, त्यांची वैशिष्ट्ये ध्यानात घेऊन त्यांच्या चेहऱ्यावर सौंदर्यप्रसाधने व रंग लावले जातात. तसेच मंचावरील दिव्यांच्या प्रकाशामध्ये कलाकारांचे भाव ठळकपणे उठून दिसावे यासाठी हे केले जाते. याला प्रचलित शब्द 'मेकअप' करणे असा आहे. उदा. एखादी वयस्कर व्यक्ती दाखवायची असल्यास केस पांढरे करणे, कोळशाच्या मदतीने डोळ्यांखाली काळी वर्तुळे निर्माण करणे इत्यादी.



### ४. प्रकाशयोजना :



मंचावरील एखाद्या भागाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी, एखादे स्थळ दर्शवण्यासाठी, एखादी घटना दर्शवण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या दिव्यांचा योग्य वापर केला जातो. हे दिवे कधी मंचाच्या वरील भागात अडकवलेले असतात तर कधी मंचाच्या बाजूला, तर कधी खालील बाजूला मांडलेले असतात. उदा. रात्रीची वेळ दाखवण्यासाठी अनेकदा निळा प्रकाश वापरण्याची पद्‌धत आहे. प्रत्येक दिवा हवा तेव्हा, हवा तसा सुरू बंद करण्याचे काम एका नियोजित व्यक्तीकडे सोपवलेले असते.

### ५. पार्श्वसंगीत :



नाटकाची परिणामकारकता वाढवण्यासाठी अनेकदा संगीताचा वापर केला जातो. हे संगीत कधी पात्रांच्या संवादांच्यामागे हळू आवाजात सुरू असते तर कधी कधी कोणताच संवाद सुरू नसताना मोठ्या आवाजात सुरू असते. उदा. जोराची हवा, वादळ होत असल्यास पाचोळा उडण्याचा आवाज ऐकवल्यास वादळाचा भास अधिक परिणामकारकपणे निर्माण करता येतो.

### नाटकातील कल्पकता

एखादे नाटक उभे करताना अनेक गोष्टींचा विचार सामान्यतः केला जातो. नाटकातले प्रसंग कुठे घडत आहेत, नाटक कुठल्या काळातले आहे, एखादा प्रसंग दिवसाच्या कुठल्या वेळी घडतो आहे इत्यादी. स्थळ, काळ, वेळ इत्यादी दर्शवण्यासाठी विविध गोष्टींचा उपयोग करता येतो. त्यातील काही आपण थोडक्यात पाहूया. मात्र हे लक्षात ठेवायला हवे की नाटक उभे करण्यासाठी स्थळ, काळ, वेळ इत्यादी गोष्टी दर्शवल्याच पाहिजेत असे काही बंधन नसते.



## विविध स्थळे दर्शवणे :

अनेकदा एखाद्या नाटकातील गोष्ट वेगवेगळ्या स्थळी घडत असते. ही सर्व स्थळे दाखवायलाच हवीत असे नाही, मात्र ती दाखवायची झाल्यास त्यासाठी काही क्लृप्त्या वापरता येतात.

१. वेगवेगळ्या स्थळांसाठी मंचावरील वेगवेगळा भाग राखून ठेवणे. उदा. समजा घर व हॉटेल अशी दोन स्थळे असतील तर मंचाचा एक कोपरा घरासारखा दिसणारा व दुसरा कोपरा हॉटेलसारखा दिसेल अशा प्रकारे सजवणे .

२. वेगवेगळी स्थळे दाखवण्यासाठी मंचाचा भाग राखून न ठेवता मंचावरील त्याच त्याच जागी तात्पुरते सामान, जागा दर्शवणारे बोर्ड आणून ठेवणे. उदा. चित्रात न्यायालय दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

३. कुठलेही सामान, बोर्ड न वापरता केवळ अभिनयाद्वारे, पार्श्वसंगीताद्वारे एखादे स्थळ दर्शवणे. उदा. पार्कमध्ये एक व्यक्ती बसली आहे हे कुठलेही सामान न वापरता केवळ तिच्या अभिनयातून व पार्कमध्ये आजूबाजूला असणारे विविध आवाज वापरून दर्शवणे.



### थोडी गंमत करू

खालील स्थळे तुम्ही नाटकात कशी दाखवणार?

त्यासाठी कशाकशाचा वापर करणार ते लिहा.

१. वाळवंट

२. समुद्र किनारा

३. शेत

४. शहरातील बस स्टॉप

विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना एकेक स्थळ द्यावे. नेपथ्य, प्रकाशयोजना व पार्श्वसंगीत या तिन्ही गोष्टींचा विचार करण्यास प्रोत्साहन द्यावे.

## वेगवेगळा काळ दर्शवणे :

अनेकदा एखाद्या नाटकातील प्रसंग वेगवेगळ्या काळात घडत असतात. काही प्रसंग चालू काळातील असतात तर काही आठवणीतले असतात. काही दिवसाचे असतात तर काही रात्रीचे असतात. काही एकानंतर एक घडतात. वेगवेगळा काळ दाखवायचा झाल्यास त्यासाठी काही क्लृप्त्या वापरता येतात.

१. दोन प्रसंगांमध्ये मंचावरचे सर्व दिवे काही सेकंद घालवून अंधार करून एक अवकाश घेता येतो. याला ब्लॅकआऊट असेदेखील म्हणतात.



२. स्वप्न किंवा आठवणीतला काळ दाखवण्यासाठी कधी-कधी वेगळ्या रंगाचा प्रकाश मंचावर टाकण्याचीदेखील एक पद्‌धत आहे.

३. मंचावर एकाच वेळी दोन वेगवेगळ्या जागी एकत्रपणे दोन वेगळ्या काळातील प्रसंग आळीपाळीने सुरू असणे.

४. सकाळची वेळ दाखवण्यासाठी जास्त पिवळा प्रकाश तर रात्रीची वेळ दर्शवण्यासाठी कमी प्रकाश व विशेषत: निळा प्रकाश वापरणे.


## माणसांव्यतिरिक्त इतर व्यक्तिरेखा रंगवणे :



नाटकाच्या विषयांची व्याप्ती फक्त मानवी गोष्टींपुरती मर्यादित नसून संघर्ष असणाऱ्या कुठल्याही कथेचे नाट्यरूपांतर करता येणे शक्य आहे. माणसांव्यतिरिक्त इतर व्यक्तिरेखा रंगवण्याचे खालील काही मार्ग असू शकतात -

१. काहीच वेगळे न करणे, संवादातून व्यक्तिरेखा स्पष्ट होणे.

२. प्राणी, पक्षी इत्यादींची व्यक्तिरेखा असल्यास मधूनमधून त्यांचे आवाज काढणे, त्यांच्यासारखे हावभाव, देहबोली साकारणे किंवा वेशभूषेतून तसे सूचित करणे.



पंचतंत्रातील गोष्टी तुम्ही सर्वांनी वाचल्या असतीलच. पंचतंत्रातील गोष्टी व इतर गोष्टींमध्ये कोणता फरक तुम्हांला जाणवतो?

कोणतीही एक गोष्ट घ्या. आपण याआधी पाहिलेल्या सर्व संकल्पनांच्या आधारे त्या गोष्टीचे नाट्यीकरण करा. प्रत्येक गटाने एक गोष्ट घ्यावी. गटातील प्रत्येकाने मंचावर येऊन नाटकामध्ये कोणतीतरी व्यक्तिरेखा साकारणे बंधनकारक आहे. निवडलेल्या गोष्टीत गटातील विद्यार्थ्यांएवढी पात्रे नसल्यास पात्रांची भर घालता येईल.

पंचतंत्रातील गोष्टी विद्यार्थ्यांना आठवायला सांगा. विद्यार्थ्यांनी त्या वाचलेल्या नसल्यास ज्या गोष्टींमध्ये मानवाचे पात्र नाही, ज्या पशुपक्ष्यांच्या आहेत, अशा कोणत्याही गोष्टी चालतील.

विद्यार्थ्यांचे ६-८ चे गट करा.

प्रत्येकाला पंचतंत्रातील एक गोष्ट निवडू द्या. त्यासाठी त्यांना पुस्तके उपलब्ध करून द्यावीत.

विद्यार्थ्यांचे गट करावेत. प्रत्येक गटाला एक-एक संवाद वाटून द्यावा. विद्यार्थी संख्या जास्त असल्यास, तेच संवाद एकापेक्षा जास्त गटांना द्यावेत.

संवाद कुठे, कसा, कोणामध्ये, कधी, कोणत्यासंदर्भात घडत आहे हे प्रत्येक गटाला ठरवू द्यावे. त्यानुसार पात्रांची देहबोली, हावभाव इत्यादींचा विचार करून अभिनय करण्यास प्रोत्साहित करा. स्थळ, काळ, वेळेनुसार गटातील विद्यार्थ्यांना नेपथ्य, पार्श्वसंगीत इत्यादींचा विचार करायला सांगावे.

सर्व गटांची तयारी झाल्यावर प्रत्येक गटाला सादरीकरण करण्याची संधी द्यावी. सादरीकरण झाल्यावर इतर गटांनी ते संवाद कोणत्या संदर्भात म्हटले जात आहेत ते सांगावे.

प्रत्येक गटातील विद्यार्थ्यांनी दुसऱ्या गटातील विद्यार्थ्यांचे सादरीकरण लक्षपूर्वक पाहावे व त्यातील चुका न शोधता आपल्याला त्यातील काय आवडले, काय आवडले नाही व का याचे स्पष्टीकरण द्यावे.

## संवादांना संदर्भ देणे

खाली काही संवाद दिले आहेत. हे संवाद कोणत्या दोन पात्रांमध्ये, कधी, कुठे घडत असतील याचा विचार करावा व त्यानुसार त्याचे सादरीकरण करावे. गटातील काही जणांनी सादरीकरण करावे व काहींनी पार्श्वसंगीत, नेपथ्य इत्यादींचा विचार करावा.

**संवाद १**

१ : "माझ्याच सोबत हे असे व्हायचे होते !"
२ : "असे नाहीये. प्रत्येकालाच हा अनुभव कधी ना कधी येतो."
१ : "पण मी काय कमी केले होते? तरी माझ्या पदरी निराशाच !"
२ : "झाले ते झाले. या अनुभवातून काय शिकायचे याचा विचार केला पाहिजेस तू"
१ : "त्याने त्रास कमी होईल का?"
२ : "त्रास कमी नाही होणार, पण पुढील त्रास वाचेल."
१ : "मला नाही आता या सगळ्यात परत पडायचे."
२ : "असे हात पाय गाळून कसे चालेले?.. थोडे धीराने घे."
१ : "सांगायला खूप सोपे आहे!"
२ : "खरंय तुझे म्हणणे.. पण दुसरा काही मार्ग आहे का?"
१ : "हं sss .. तुलापण कधीतरी असा अनुभव आला असेल ना? .. तू काय केलेस त्या प्रसंगी?"
२ : "पुन्हा नव्याने प्रयत्न केले.. निराशेला मी माझ्यावर मात करू दिली नाही !.. आणि माझ्यामते तूदेखील हेच केले पाहिजेस."
१ : "हो. प्रयत्न तर केलेच पाहिजेत.. ठीक.. पुन्हा नव्याने सगळे सुरू करूया."


**संवाद २**

१ : "किती वाजलेत?"
२ : "१२.००"
१ : "अजून कशी आली नाही?"
२ : "हो.. तिला इतका उशीर कधीच होत नाही"
१ : "आजकाल काही सांगता येत नाही. पावसापाण्याचे दिवस आहेत. उशीर होतोच"
२ : "गेले दोन तास वाट बघतोय आपण. असंच बसून रहायचे का?"
१ : "आणखी थोडा वेळ थांबूया.. कदाचित येतच असेल."



२ : "मला आता काळजी वाटायला लागली आहे .."
१ : "विचारायचे का कोणाला तरी ?"
२ : "कोणाला विचारणार?"
१ : "तेही खरेच."
२ : "वेळ पाळायला का जमत नाही? नेहमीचं झालंय हल्ली हे"
१ : "हो.. मागे एकदा तर तिचे येणेच अचानक रद्द झाले."
२ : "मग?"
१ : "मग काय.. आम्ही आपले बसलो वाट बघत."
२ : "आपण काही बोलत नाही ना.. त्याचा हा परिणाम."
१ : "एक मिनिट.. आवाज आला ना.. आली वाटतं."

## संवाद ३



१ : "मी सगळी तयारी केली आहे."
२ : "हे कुठे ठेवू ?
१ : "त्या कोपऱ्यात ठेवा."
२ : "हे उभे ठेवू की आडवे?"
१ : "उभेच ठेवा. अडचण नको."
२ : "हे उरलेले पैसे. कमी पैशात मिळाले सारे सामान."
१ : "छान. आपल्याला पुढे कामी येतील."
२ : "किल्ल्या हव्या होत्या. कुठे असतील?"
१ : "किल्ल्या कशाला हव्या आहेत? मी उघडून देईन."
२ : "बरं. तसं तर तसं.. उगीच वाद नको."
१ : "वादाचा प्रश्न नाही.. माझ्यावर जबाबदारी आहे."
२ : "आम्हीदेखील जबाबदारीने केले असते की काम."
१ : "ते तुमच्या कृतीतून दिसून यावे लागते."
२ : "ठीक. भांडू नका. काम वेळेत झाल्याशी कारण."
१ : "हं हं SS "
२ : "बाप रे ! वेळ झाली. आवरले की नाही?"
१ : "हो. मी तयार आहे."
२ : "मीदेखील."

## संवाद ४

१ : "काय आहे ते हातामध्ये?"
२ : "कुठे काय? काही नाही."
१ : "काही नाही कसे? मग हात का मागे लपवले आहेत?"
२ : "कुठे लपवले आहेत?.. हाताची घडी केलीये पाठीमागे."
१ : "मग पुढे का आणत नाही?"
२ : "माझ्यावर विश्वास नाही का?"
१ : "नाही ना काही लपवण्यासारखे? मग हात पुढे घ्यायला काय हरकत आहे?"
२ : "मी काहीच लपवत नाही. मी का घेऊ?"
१ : "हे बरंय.. आधी स्वत:च लपवाछपवी करायची, मग प्रामाणिकपणाचा आव आणायचा."
२ : "आता खूप होतंय.. मी सांगितले ना काही लपवत नाही म्हणून!"
१ : "नाही नाही.. मलाच भास होतो आहे !"
२ : "होत असेल!"
१ : "विषय बदलायची गरज नाही."
१ : "हात पुढे आले नाही तर मलाच तिकडे यावे लागेल!"
२ : "काय हा वेडेपणा .."
१ : "नाही.. आता होऊनच जाऊदे ..मलाच यावे लागेल!"
२ : "नको.. नको.. अरे देवा.. सांभाळून..."
१ : "बापरे ! काय हे? हाच दिवस पाहणे बाकी राहिले होते !"

## दिग्दर्शकाची भूमिका



मागील उपक्रमातील संवाद तुम्ही पाहिलेत. ते संवाद खरेतर कोणत्याही पात्रांमध्ये, कोणत्याही स्थळी, वेगवेगळ्या संदर्भात होऊ शकले असते. ते संवाद कोणामध्ये घडत आहेत, का घडत आहेत? पात्रे कुठे आहेत, कुठल्या काळातली आहेत हे सगळे तुम्ही आपसात ठरवले व त्या संवादांचे वाचन केले. त्याचप्रमाणे जेव्हा एखादी गोष्ट, नाटक लिखित स्वरूपात असते, तेव्हा ते उभे करताना त्या लिखित नाटकाचा अर्थ लावणे, प्रत्येक संवादातून कोणती भावनिक छटा बाहेर येणे अपेक्षित आहे, मंचावर प्रसंग कसे दाखवले जातील, नाटकातील पात्रे कशी वागतील, बोलतील, कोणते प्रसंग आहे तसेच दाखवायचे, कोणते प्रसंग थोडे कमी, जास्त केले पाहिजेत, बदलले पाहिजेत, हे सर्व ठरवणे गरजेचे असते. ते काम करण्याची जबाबदारी एका विशिष्ट व्यक्तिची असते. त्याला/तिला दिग्दर्शक/दिग्दर्शिका असे म्हणतात.

## सूत्रसंचालन

तुम्ही एखाद्या कार्यक्रमात स्टेजवर, माईकसमोर बोलण्याचा अनुभव कधी घेतला आहे का? माईकसमोर किंवा माईक हातात घेऊन बोलताना तुम्हांला कसे वाटते?

तुम्ही अनेकदा टीव्हीवर किंवा प्रत्यक्ष मोठ्या स्टेजवर काही कार्यक्रमांचे निवेदन करत असलेल्या निवेदकाला/निवेदिकेला पाहिले असेल. नियोजित कार्यक्रमातील एक कार्यक्रम झाल्यानंतर त्यापुढील कार्यक्रम कोणता आहे हे प्रेक्षकांना समजणे जरुरीचे असल्याने त्याअनुषंगाने जे निवेदन केले जाते त्याला 'सूत्रसंचालन' असे म्हटले जाते व हे सूत्रसंचालन करणारी व्यक्ती म्हणजे 'सूत्रसंचालक' होय. सूत्रसंचालन करणे हादेखील आता एक व्यवसाय आहे.



### थोडी गंमत करू

कागदाची गुंडाळी करून ती तोंडासमोर धरा व स्वत:चे नाव सांगून वर्गातील मित्र-मैत्रिणींचे, गुरुजनांचे स्वागत करण्याच्या सूत्रसंचालनाचा नमुना वर्गात सादर करा.

उदा. "नमस्कार, मी स्वराज, आज इथे जमलेल्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो."

## नृत्य



नृत्य हा असा कलाप्रकार आहे ज्यामध्ये एखादा आशय व्यक्त करण्यासाठी हेतुपूर्वक निवडलेल्या सुंदर हालचाली, क्रमवार आणि लयबद्ध रीतीने केल्या जातात हे आपण मागील वर्षी पाहिलेच आहे. यावर्षी आपण नृत्यातील काही घटक व बारकावे शिकणार आहोत.


## रोजच्या आयुष्यात नृत्याशी असलेला संबंध

थोडे आठवून बघा. तुमच्या रोजच्या आयुष्यामध्ये नृत्याशी किंवा नृत्यसदृश हालचालींशी तुमचा संबंध येतो का? कधी येतो? क्रिकेटची मॅच जिंकल्यावर आनंद व्यक्त करायला खेळाडू नाचतात, मिरवणुकीत आपण नाचतो, चित्रपटांमध्ये नृत्य हा अविभाज्य घटक असतो, स्नेहसंमेलनाच्या वेळी नृत्ये सादर केली जातात, एखादे गाणे ऐकत असताना पायाने ठेका धरतो, लहान मुलांच्या खेळण्याची चावी फिरवल्यास ते नाचायला लागते इत्यादी. या यादीत तुम्हांला आणखी काही भर घालता येईल का? यादीकडे बघता नृत्याच्या आपल्या जीवनात असलेल्या स्थानाबद्दल आपल्याला काय म्हणता येईल?

## आपण नृत्य का करतो?

नृत्याचे मानवी आयुष्यात अविभाज्य असे स्थान आहे. अगदी आदिम काळापासून मानवी संस्कृतीमध्ये नृत्याचा समावेश असल्याचे दिसून आले आहे. स्पेनमधील आदिमानवाच्या काळातील चित्रे असोत किंवा मध्यप्रदेशमधील भीमबेटका येथील लेण्यातील चित्रे असोत, त्याकाळच्या जीवनशैलीतही नृत्याला महत्त्वाचे स्थान असल्याचे निदर्शनास येते.





तसेच कर्नाटकातील बदामी येथील ६ व्या शतकातील मंदिरांमध्ये, वेरूळच्या लेण्यांमध्ये देखील नटराजाचे (नृत्य करणारा शिव) शिल्प पाहायला मिळते. नृत्याला मानवी आयुष्यात असलेले महत्त्वच यावरून स्पष्ट होते.



काही संशोधक असे मानतात की नृत्य करणाऱ्या जमातींना त्यानिमित्ताने एकत्र राहण्याची सवय लागली व सामाजिक बांधिलकी वाढली. त्याचा फायदा त्यांना विपरीत परिस्थितीतही तग धरून राहण्यास झाला. यामुळे अशा नृत्य करणाऱ्या जमाती हिमयुगात देखील जगू शकल्या. त्यामुळेच आज नृत्य व संगीताची परंपरा आपल्याला जगभर पाहायला मिळते.

काही संशोधकांचे असे देखील मत आहे की आपल्या मेंदूतील काही आनंद केंद्रे ही एकत्रितपणे लयबद्ध केलेल्या हालचालींनी उद्दीपित होतात. एवढेच नव्हे तर इतरांनी एकत्रितपणे केलेल्या लयबद्ध हालचाली पाहून देखील आपल्या मेंदूतील आनंदकेंद्रे उद्दीपित होतात व आपण आनंदाची अनुभूती घेतो.

नृत्य हे विविध प्रसंगी केले जात असल्याचे इतिहासात दिसून येते. बोली भाषा विकसित होण्याआधी स्त्री पुरुषांमध्ये एकमेकांना आकर्षित करण्यासाठी नृत्याचे माध्यम वापरले जाई. पूर्वीच्याकाळी युद्धाच्या प्रसंगीदेखील नृत्य होई. नाचणाऱ्या योद्ध्यांच्या अंगी शारीरिक उत्साह व शौर्य वाढण्याकरिता नृत्याचा उपयोग केला जात असे. तसेच युद्धात विजय झाल्यावर आनंदोत्सव साजरा करण्याच्या प्रसंगी देखील नृत्य केले जाई.





त्याचप्रमाणे चांगले पीक यावे म्हणून, तसेच चांगले पीक आल्यावर देवाचे आभार मानण्यासाठी नृत्य केले जात असे. पंजाबातील भांगडा तसेच गिड्डा ही अशाच प्रसंगी केली जाणारी नृत्ये आहेत. देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी नृत्य करण्याची प्रथा आहे.

### लोकनृत्याचे काही प्रकार

इयत्ता ९ वीमध्ये आपण भारतीय शास्त्रीय नृत्याचे प्रकार पाहिले होते. आता आपण महाराष्ट्रातील काही लोकनृत्याचे प्रकार पाहूया.

लोकनृत्य म्हणजे विशिष्ट समुदायातील लोकांनी विशिष्ट प्रसंगी एकत्र येऊन केलेले नृत्य. काही नृत्यप्रकार पाहूया.

### बाल्या नृत्य किंवा जाखडी नृत्य

प्रांत : कोकण आणि मुंबई



हे नृत्य साधारणत: श्रावण महिना ते दिवाळीपर्यंतच्या काळात सादर केले जाते. कारण या काळात अनेक सण-उत्सव असतात. पुणे, मुंबई, नाशिकसारख्या ठिकाणी गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीतही हे नृत्य बघायला मिळते. हे नृत्य गोल फेर धरून केले जाते. एक-दोन गायक, वादक आणि कोरस देणारे हे गोलाच्या मध्ये बसतात. त्याच्याभोवती नृत्य करणारे असतात. त्यांच्या एका पायात घुंगरु बांधलेले असतात. एका पायावर जोर देऊन नृत्य करणे हे या नृत्याचे वैशिष्ट्य आहे.

### आदिवासी नृत्य

आदिवासी नृत्य –भिल्ल, कोरकू, ठाकर, वारली, कातकरी, गोंड अशा आदिवासी जमाती सणासुदीच्या

आणि दु:खाच्या प्रसंगी विविध प्रकारचे नृत्य करतात. ही नृत्ये विविध वाद्यांच्या नावाने ओळखली जातात. उदा. ढोल नृत्य, तंबोरी नृत्य, तारपा नृत्य इत्यादी नृत्ये आदिवासी लोक गोल फेर धरून संथ किंवा जलद गतीने करतात. "वारी घालणे" हा भिल्ल जमातीत अंत्यविधीच्या वेळी केला जाणार नृत्य प्रकार आहे .



## तारपा नृत्य



आदिवासी समाजाच्या सण-उत्सवात वा मंगलप्रसंगी एक लक्षवेधी नृत्य असते ते म्हणजे तारपा नृत्य. वारली समाज कलासक्त आहे. उत्सवप्रिय आहे. वारली पेंटींग जसे प्रसिद्ध आहे तसेच या समाजातील तारपा नृत्य हेदेखील प्रसिद्ध आहे. मंगल प्रसंग, लग्न अशा वेळी तर तारपा नृत्याचा फेर धरला जातोच पण डोंगरमाळावरील जमिनीवर जेव्हा भाताची किंवा नागलीची लागवड केली जाते तेव्हा तारपा नृत्योत्सव साजरा केला जातो.

## धनगरी गाजा




हे नृत्य महाराष्ट्रातील धनगर समाजात केले जाते. धनगर समाज निसर्गात रमत असल्यामुळे जास्त करून त्यांची गाणी निसर्गाशी निगडित असतात. तसेच त्यांची काही गाणी ही त्यांच्या दैवताच्या जन्मकथेशी निगडित असतात. हे नृत्य ढोलावर सादर केले जाते.

## कोळी नृत्य



हे कोळी लोकांचे लोकप्रिय नृत्य आहे. सणासुदीच्या दिवशी आणि लग्नप्रसंगात कोळी स्त्री-पुरुष समूहाने नाचतात. कोळीनृत्यातील ताल, ठेका, पदन्यास बघण्यासारखा असतो. कोळीगीते सुद्धा महाराष्ट्रात तितकीच लोकप्रिय आहेत.

## लेझीम



हा वीररसयुक्त नृत्य प्रकार आहे. सभा, मिरवणुका, जत्रा इत्यादी ठिकाणी लेझीम नृत्य केले जाते. ढोल, घुमकं आणि हलगीच्या तालावर हे नृत्य सादर केले जाते. लेझीममध्ये विविध नृत्य प्रकार येतात. त्यात विशिष्ट तालबद्ध हालचाली असतात. हा व्यायामप्रकार म्हणूनही ओळखला जातो. काही शाळांमध्ये शारीरिक शिक्षणात ह्या प्रकाराचा समावेश केला जातो.

## लोकनृत्य व शास्त्रीय नृत्य यांमधील फरक

मागील वर्षी आपण शास्त्रीय नृत्यांबद्दल माहिती घेतली होती तर यावर्षी आपण लोकनृत्याबद्दल माहिती घेतली. तुम्हांला या दोन्ही प्रकारांमध्ये काही फरक जाणवतो का? जाणवत असल्यास कोणता फरक जाणवतो?

विद्यार्थ्यांना मागील वर्षीच्या पुस्तकाचा संदर्भ घेऊन फरकांबद्दल स्वत: विचार करायला प्रवृत्त करा. दोन्हींचा खालील मुद्द्यांच्या आधारे विचार करावा.

उगम, नियम, समाजातील स्थान, मिळालेला राजाश्रय इत्यादी. याबद्दल अधिक माहिती इंटरनेटवरून शोधता येईल.

नृत्यातील हावभाव व लयबद्ध शारीरिक हालचाली ही नृत्याची दोन मुख्य अंगे आहेत हे आपण मागील वर्षी पाहिलेच आहे. मात्र या दोन्ही गोष्टी सहजतेने करण्यासाठी आपल्या मनात असलेला संकोच व भीती दूर होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच आपल्या शरीरावर, शारीरिक हालचालींवर नियंत्रण असणे यासाठी आवश्यक आहे. खालील काही कृती करून बघणे उपयुक्त ठरेल.

### नृत्यातील हावभाव




आपल्या चेहऱ्यावर योग्य ते भाव दाखवण्यासाठी आपले आपल्या अवयवांवर नियंत्रण असणे महत्त्वाचे आहे. खालील काही हालचाली करून पहा -

- दोन्ही भुवया उंचावणे.
- एक भुवई उंचावणे.
- कपाळावर आडव्या आठ्या पाडणे. (आश्चर्य व्यक्त करणाऱ्या)
- कपाळावर उभ्या आठ्या पाडणे. (चिडचिड व्यक्त करणाऱ्या)

- नाकपुड्या फुगवणे.
- डोळे आजूबाजूला, वरखाली, गोलाकार फिरवणे.
- डोळे वटारणे.
- तोंड वेंगाडणे.

बाजूला दिलेले हावभाव विद्यार्थ्यांकडून करून घ्या. त्यानंतर विद्यार्थ्यांचे दोन दोनचे गट करा. प्रत्येक गटातील एका जणाने चेहऱ्यावर काही हावभाव आणावेत व दुसऱ्याने त्या हावभावांची नक्कल करावी. मग दुसऱ्याने हावभाव करावे व पहिल्याने नक्कल करावी.

## थोडी गंमत करू



काही विद्यार्थ्यांनी एक-एक करून समोर यावे व खाली दिलेल्या भावना फक्त चेहऱ्यावरील हावभावांनी व्यक्त कराव्यात. इतरांनी त्या भावना व्यक्त करताना चेहऱ्यावरील कोणत्या अवयवांची हालचाल होत आहे याची वहीत नोंद करावी.

राग, द्वेष, दया, वात्सल्य, आनंद, दु:ख, शारीरिक वेदना, सहवेदना, घृणा, भीती, आश्चर्य, कुतूहल इत्यादी.

### नृत्यातील लयबद्ध हालचाली

पाश्चात्य नृत्यशैलीतील महत्त्वाच्या घटकांपैकी तीन घटक-

- अवकाश
- काळ
- जोश

### अवकाश

नृत्यातील हालचाल करताना जागेचा वापर कसा केला जातो ? नाचणारी व्यक्ती लयबद्ध हालचाली करण्यासाठी उपलब्ध असलेली जागा कशाप्रकारे वापरते याचा नृत्याचे सौंदर्य वाढवण्यात मोठा वाटा असतो.

#### करून पहा

- विद्यार्थ्यांनी आपल्या शरीराचा वापर करून विविध आकार बनवून पाहावेत. (गोल, आयत, त्रिकोण) एकेकाने किंवा तीन चार विद्यार्थ्यांच्या गटालादेखील हे करता येईल.
- वेगवेगळ्या उंचीची उडी मारून खाली बसणे.
- शरीर वाकवणे. (पुढे, मागे, बाजूस, तिरके, गोलाकार जाणे.)
- हाताने किंवा पायाने विविध प्रकारच्या हालचाली करत उपलब्ध असलेल्या जागेत इकडून तिकडे फिरणे.

एखाद्या मोठ्या मोकळ्या जागेत, मैदानात किंवा सभागृहात पुढील उपक्रम घ्यावेत. प्रत्येक विद्यार्थ्याला उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावे. स्वत:च्या हालचाली निवडण्याची विद्यार्थ्यांना मुभा द्यावी. एका वेळेला एकाच विद्यार्थ्याने किंवा गटाने कृती करावी म्हणजे गोंधळ होणार नाही.

## काळ

नृत्यातील हालचाली किती जलद, संथ होत आहेत किंवा कोणत्या ठेक्यावर होत आहेत, याचादेखील नृत्याचे सौंदर्य, वेगळेपण, अर्थपूर्णता वाढवण्यात मोठा वाटा असतो.

### करून पहा

- विद्यार्थ्यांनी एकच ठरावीक हालचाल अति संथ, संथ, जलद, अति जलद गतीने करून पहावी.
- आता वरील सर्व हालचाली एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाताना करून पाहाव्यात.

एखादे जोशपूर्ण संगीत वाजवावे. प्रत्येक विद्यार्थ्याला उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावेत. स्वत:च्या हालचाली निवडण्याची विद्यार्थ्यांना मुभा द्यावी. एका वेळेला एकाच विद्यार्थ्याने किंवा गटाने कृती करावी म्हणजे गोंधळ होणार नाही.

## जोश

नृत्यातील हालचाली गरजेप्रमाणे किती जोशपूर्ण पद्धतीने किंवा हळूवारपणे केल्या जातात, याचा नृत्याचे सौंदर्य, वेगळेपण, अर्थपूर्णता वाढवण्यात मोठा वाटा असतो.

### करून पहा

- विद्यार्थ्यांनी एकच ठरावीक हालचाल अत्यंत जोशपूर्ण पद्धतीने व अत्यंत हळूवारपणे करावी.
- आता वरील सर्व गोष्टी एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाताना करून पाहाव्यात.

एखादे जोशपूर्ण संगीत वाजवावे. प्रत्येक विद्यार्थ्याला उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावे. स्वत:च्या हालचाली निवडण्याची विद्यार्थ्यांना मुभा द्यावी. एका वेळेला एकाच विद्यार्थ्याने किंवा गटाने कृती करावी म्हणजे गोंधळ होणार नाही.

## चला उपयोजन करू

दिलेल्या संगीतावर अवकाश, काळ व जोश या तिन्हींचा विचार करून नृत्य बसवा व त्याचे सादरीकरण करा. इतरांचे सादरीकरण बघा. सादरीकरण झाल्यावर प्रत्येक गटाच्या सादरीकरणाबद्दल खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा –

- संगीताला अनुसरून नृत्याचा बाज होता का?
- संगीताला अनुसरून हालचालींची गती होती का?
- संगीताला अनुसरून योग्य त्या प्रसंगी हालचाली जोशपूर्ण किंवा हळूवारपणे केल्या होत्या का?
- उपलब्ध जागेचा योग्य वापर करणाऱ्या हालचाली होत्या का?

विद्यार्थ्यांचे ५–६ चे गट करा. एका गटाने दुसऱ्या गटासाठी एखादे विशिष्ट संगीत निवडावे. दुसऱ्या गटाने संगीत ऐकून त्यानुसार उपलब्ध असलेल्या जागेचा कसा वापर करायचा, कोणत्या हालचाली बसवायच्या, हालचालींची गती कशी असावी, त्यांच्यात किती वैविध्य असावे, त्या जोशपूर्ण की हळूवार असाव्यात याचा विचार करून नृत्य दिग्दर्शित करावे.



## संगीत

### थोडी गंमत करू

मागील वर्षभरात तुम्हांला आवडलेले संगीत कोणते? ते संगीत तुम्हांला का आवडले? खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा –

१. चाल

२. गायन

३. वापरलेली वाद्ये

४. ठेका

५. गाण्याचे शब्द

विद्यार्थ्यांशी वर्गात चर्चा करा. विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या प्रत्येक प्रकारच्या संगीताबद्दल, दिलेल्या मुद्द्यांचे आधारे चर्चा करा.

इयत्ता ९ वीमध्ये आपण संगीताबद्दल काही प्राथमिक माहिती घेतली. यावर्षी आपण भारतीय ताल वाद्य व गीतप्रकार यांबद्दल अधिक माहिती घेऊ.

## भारतीय वाद्ये

भारतीय ताल वाद्यांचे ४ प्रकार आहेत –

### १. तंतु वाद्ये

ज्यामध्ये तारांच्या मार्फत स्वर निर्मिती होते, त्यांना तंतु वाद्ये म्हटले जाते. यात देखील दोन प्रकार असतात. तत वाद्ये व वितत वाद्ये.

**तत वाद्ये :** या वाद्यांमध्ये तारांना इतर कोणत्यातरी वस्तूने किंवा हाताने छेडले जाते. उदा. वीणा, सतार, तंबोरा, सरोद इत्यादी.

**वितत वाद्ये :** या वाद्यांमध्ये तारांना गजाच्या साहाय्याने छेडले जाते. उदा. सारंगी, व्हायोलीन इत्यादी.

### २. सुषिर वाद्ये

जी वाद्ये फुंकर घातल्यामुळे किंवा हवेमुळे नाद निर्माण करतात, त्यांना सुषिर वाद्ये असे म्हणतात. उदा. बासरी, हार्मोनियम, सनई इत्यादी.

### ३. अवनद्ध वाद्ये

चामड्याने मढलेली तालवाद्ये या प्रकारात येतात. उदा. तबला, मृदंग, ढोलक, डमरू इत्यादी.

### ४. घन वाद्ये

या वाद्यांमध्ये, आघात केल्यामुळे स्वर निर्मिती होते. उदा. जलतरंग, झांज इत्यादी.

### थोडी गंमत करू

विविध प्रकारची पाच गाणी ऐका. त्या गाण्यांमध्ये कोणकोणत्या प्रकारची वाद्ये वापरली आहेत हे तुम्हांला ओळखता येईल का? जमल्यास त्यामधील वाद्यांची नावे तुम्हांला ओळखता येतील का?

विद्यार्थ्यांशी वर्गात चर्चा करा. प्रत्येक गाण्यात कुठल्या प्रकारची वाद्ये वापरली आहेत व त्यांची नावे काय हे ओळखण्यास विद्यार्थ्यांना मदत करा. कदाचित सर्वच वाद्यांची नावे ओळखता येणार नाहीत. त्यावेळी मार्गदर्शन करा.


### भूभागानुसार प्रचलित वाद्ये

भारत हा प्रचंड वैविध्याने नटलेला देश आहे. प्रत्येक राज्याची आपली अशी एक संस्कृती आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक राज्याचे, भागाचे असे आपले विशिष्ट पारंपरिक संगीत आहे. या पारंपरिक संगीतासाठी वापरलेली वाद्ये देखील विशिष्ट आहेत. उदा. महाराष्ट्रातील लावणी या गीतप्रकारात ढोलकीचा ताल हा अत्यंत महत्त्वपूर्ण मानला गेला आहे. दाक्षिणात्य संगीतामध्ये मृदंगम् किंवा घटम् यांचे महत्त्वाचे स्थान असते. राजस्थानी संगीतामध्ये सारंगी व अल्गोझा नावाची बासरी प्रामुख्याने वापरली जाते.

विद्यार्थ्यांचे गट करा. प्रत्येक गटाला एक-एक प्रांत वाटून द्या. त्या प्रांतातील संगीत ऐकण्यास वेळ व साधने उपलब्ध करून द्या. प्रत्येक गटाने गाणी ऐकून कोणकोणत्या वाद्यांचा त्यात प्रामुख्याने उपयोग केला आहे याबद्दल चर्चा करा.

अशाच प्रकारे इतर प्रांतांत वापरल्या जाणाऱ्या वाद्यांबद्दल आपल्याला काही सांगता येईल का?

**थोडी गंमत करू**



### स्वत: वाद्य निर्माण करणे

तुम्हांला तुमच्या आजूबाजूला उपलब्ध असलेले डबे, बाटल्या, तारा, रबर यांचा वापर करून काही वाद्य निर्मिती करता येईल का? त्यातून कर्ण मधुर नाद निघायला हवा, इतकेच महत्त्वाचे आहे.

### ऑर्केस्ट्रा वाद्यवृंद तयार करणे

तुम्ही तयार केलेली वाद्ये वापरून एक ऑर्केस्ट्रा तयार करा व एक गाणे बसवा.

विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार गटात किंवा एकटेच काम करू द्यावे. प्रत्येकाने पुढे येऊन स्वत: बनवलेल्या वाद्यांचे प्रात्यक्षिक करावे.

विद्यार्थ्यांचे गट करा. प्रत्येक गटाने एक गाणे बसवणे अपेक्षित आहे. त्या गाण्याचे सादरीकरण स्नेहसंमेलनात किंवा तुमच्या वर्गात करा.

### गीत

शास्त्रीय संगीतात गीते गायली जातात. गीतांचे अनेक प्रकार राग गायनात प्रचारात आहेत. हे गीत प्रकार समजावून घेण्यापूर्वी गीत कसे असावे यासंबंधी फार पूर्वीपासून संगीत तज्ज्ञांनी जे प्रतिपादन केले आहे त्याचा प्रथम विचार करू. संगीताचा प्रधान हेतू मनाचे रंजन करणे हा असल्याने गीत रचनेत ते सामर्थ्य असले पाहिजे. या दृष्टीने आदर्श गीताची लक्षणे कोणती याबाबत जुन्या संगीत ग्रंथात पुढील श्लोक आढळतो.

**सुस्वरम्, सुरसम् चैव, मधुरम् मधुराक्षरम्**
**सालंकारम् प्रमाणं च षडवर्यम् गीतलक्षणम्**

याचा अर्थ, उत्तम स्वरांनी नटलेले, योग्य रसांचा (भावांचा) परिपोष करणारे, मधुर अक्षरांनी युक्त व गोड राग रचनेत बांधलेले, अलंकारयुक्त, योग्य लयीत प्रमाणबद्ध केलेले अशा गीतांची सहा लक्षणे आहेत.

### थोडा विचार करा

ESKRVL

- तुम्ही ऐकलेली कोणती तीन गीते वरील निकषांवर उतरतात?
- जुन्या काळातील संगीत व या काळातील संगीत यांमध्ये तुम्हांला काही फरक जाणवतो का? विचार करा.

## मूल्यमापन (भारांश २०%)

| निकष | उत्तम (खूप चांगले) | योग्य (समाधानकारक) | अयोग्य (असमाधानकारक) | गुण |
|---|---|---|---|---|
| **नाट्य**<br>संवादांना संदर्भ देणे | योग्य संदर्भ देऊन त्याप्रमाणे आवाज, देहबोली इत्यादींचा योग्य वापर केला. | योग्य संदर्भ दिला पण आवाज देहबोली इत्यादींचा योग्य वापर केला नाही. | संदर्भहीनपणे नुसती वाक्ये म्हटली | |
| **संगीत**<br>वाद्य निर्मिती | नाद निर्माण करणारे वाद्य निर्माण केले. वाद्य निर्मितीमध्ये कल्पकता दिसून आली. | वाद्य निर्मिती केली पण त्यातून निघणारा ध्वनी कर्णमधुर नव्हता. | वाद्य निर्मिती केलीच नाही. | |
| **नृत्य**<br>नृत्य सादरीकरण | पाठात दिलेल्या निकषांच्या आधारे जोश, काळ व अवकाश यांचा योग्य वापर करून नृत्य सादर केले | चारपैकी दोन मुद्द्यांच्या आधारे सादरीकरण केले | एखाद्याच निकषाचा वापर करून केवळ कृती पूर्ण केली. | |


१० वीची परीक्षा संपली होती. निकाल जाहीर झाला नव्हता. पाचही जण त्यांच्या आवडत्या आंब्याच्या झाडाखाली गप्पा मारत बसले होते.
मला खूप रुखरुख वाटते आहे. आता आपली मैत्री तुटणार.. आपण सगळे वेगवेगळ्या दिशांनी जाणार.. आपल्या भेटी कमी होतील.. सगळी मजा संपली..
अशी निराश का होतेस?.. उलट आता आपण एका नवीन खऱ्या जगात प्रवेश करणार आहोत..
हो रे.. म्हणूनच.. उत्सुकतापण आहे आणि काळजीपण आहे.. यापुढे काही अडचणी आल्या तर?
अडचणी तर येणारच.. आठवतंय.. धैर्यधर व धैर्यशीला आपल्याला सोडून जाताना देखील आपल्याला असेच वाटले होते.. पण आपणंच स्वत:चे प्रश्न सोडविले.. नाही का?
हो.. आणि या पुढे देखील आपले प्रश्न आपल्यालाच सोडवावे लागतील.. आपण या दोन वर्षांत जे शिकलो ते आपल्यासोबत नेहमी राहील.. आणि पुढील आयुष्यात आपल्या कामी येईल.
मला एक नक्की समजले आहे.. यशस्वी होण्याइतकेच चांगले नागरिक होणे, इतरांची मदत करणेदेखील महत्वाचे आहे.
आणि मूल्याधिष्ठित जगणे देखील !
कोणत्याही प्रश्नाला न घाबरता तोंड दिले पाहिजे !
एकदा अपयश आल्याने सगळे संपत नाही.. आपण नेहमीच पुन्हा प्रयत्न करू शकतो..
आणि कोणास ठाऊक.. कदाचित यशस्वी झाल्यावरही असेच एकमेकांना भेटत राहू.. खोड्या काढायला..
सगळे हसतात.

## संदर्भ


१. आकृती – आभा भागवत

२. संगीत शास्त्र परिचय – आनंद म. गोडसे

३. संगीत शास्त्र – डॉ. वसंतराव राजोपाध्ये

४. संगीत विशारद – वसंत

५. २१ व्या शतकातील जीवनकौशल्यांवर संशोधन व विकास – श्यामची आई फाऊंडेशन.

६. देवनागरी चित्रे – विष्णुपंत चिंचाळकर गुरुजी

७. Discipline without tears - Rudolf Dreikurs

८. Positive Discipline - Jane Nelson

९. Superiority and social interest - Alfred Adler


## संदर्भासाठी संकेतस्थळे


1. www.safindia.org
2. http://mahacareermitra.in
3. http://ccrtindia.gov.in
4. http://ncert.nic.in
5. https://www.hindustantimes.com
6. https://www.elementsofdance.org
7. http://centurydancesport.com
8. http://www.nationalartsstandards.org
9. https://www.slideshare.net
10. www.marathiworld.com
11. http://majhamaharashtra.net
12. http://ketkardnyankosh.com


पुस्तकातील काही चित्रे शैक्षणिक उपयोगासाठी इंटरनेटवरून घेतलेली आहेत.


***









































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

स्व–विकास व कलारसास्वाद इयत्ता दहावी (मराठी)

₹ ६३.००